# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.05.2025** **वार:बुधवार**

1. विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी देशातील प्रत्येकाचं योगदान आवश्यक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 69 मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान; राज्यातील सहा मान्यवर पद्म पुरस्कारानं सन्मानित
3. शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तासाठी लागणारं नोंदणी शुल्क माफ करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
4. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या 'अनादि मी.. अनंत मी...' गीताला; पहिला छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार प्रदान आणि
5. राज्याच्या बहुतांश भागात पावसाचा जोर कायम; आजचा दिवसही पावसाचा

**पंतप्रधान**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी देशातील प्रत्येकाचं योगदान आवश्यक आहे; असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल गुजरातमध्ये गांधीनगर इथे आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. देशातील प्रत्येकानं स्वदेशी उत्पादनं खरेदी करण्याला प्राधान्य द्यावं असं आवाहन करताना पंतप्रधान म्हणाले.....

**सचमुच में ऑपरेशन सिंदूर के लिए एक नागरिक के नाते मुझे एक काम करना है। आप घर में जाकर सूची बनाइए कि आपके घर में 24 घंटे में सुबह से दूसरे दिन सुबह तक कितनी विदेशी चीजों का उपयोग होता है। आपको पता ही नहीं होता है, देश को अगर बचाना है, देश को बनाना है, देश को बढ़ाना है, तो ऑपरेशन सिंदूर यह सिर्फ सैनिकों के जिम्मे नहीं है। ऑपरेशन सिंदूर 140 करोड़ नागरिकों की जिम्मे है। देश के विकास के लिए भागीदार बने, दायित्व संभाले। हम इतना तय कर लें कि 2047, जब भारत के आजादी के 100 साल होंगे। विकसित भारत बनाने के लिए तत्काल भारत की इकोनॉमी को 4 नंबर से 3 नंबर पर ले जाने के लिए अब हम कोई विदेशी चीज का उपयोग नहीं करेंगे। हम गांव-गांव व्यापारियों को शपथ दिलवाएं, व्यापारियों को कितना ही मुनाफा क्यों ना हो, आप विदेशी माल नहीं बेचोगे।**

**पद्म पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात राज्यातील सहा मान्यवरांना सन्मानित करण्यात आलं. माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांना लोककार्यासाठी मरणोत्तर पद्मभूषण सन्मान प्रदान करण्यात आला. शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे,

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, डॉ. विलास डांगरे, आणि सुभाष शर्मा यांना पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला.

**<u>मंत्रिमंडळ</u>**

शेत जमिनीच्या वाटपपत्राच्या दस्तावर आकारण्यात येणारं नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे शासनाच्या महसुलात मोठी घट येण्याची शक्यता असली तरी शेतीच्या वाटप पत्राची नोंदणी न केल्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून सुटका करण्यासाठी नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>आढावा</u>**

राज्यात अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा कालच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आढावा घेण्यात आला. शेती आणि घरांच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावेत आणि नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

**<u>प्राप्तिकर विवरण</u>**

प्राप्तिकर विवरण भरण्यासाठीची मुदत केंद्रीय प्रत्यक्ष करमंडळाने 15 सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. दरवर्षी 31 जुलै पर्यंत करदात्यांना परताव्यासाठी विवरणपत्र भरता येतात. मात्र, यंदा 15 सप्टेंबरपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे.

**<u>राज्य प्रेरणागीत</u>**

राज्य सरकारचा पहिला छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित 'अनादि मी.. अनंत मी…' या गीताला काल प्रदान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानने हा पुरस्कार स्वीकारला.

**<u>सावरकर अध्यासन</u>**

मुंबई विद्यापीठातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवन कार्याला समर्पित असलेल्या अभ्यास आणि संशोधन केंद्राचं उद्घाटन काल राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते झालं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित ठिकाणांना जोडणारी अखिल भारतीय सावरकर पर्यटन साखळी तयार करावी, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं.

स्वातंत्र्यवीर सावरकर व्यक्ती नव्हे तर संस्था होते; असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले………

**आपण अनेकवेळा म्हणतो 'he was not a person he was an institution' अशा प्रकारे ते एक व्यक्ति नव्हते सावरकर एक संस्था होते आणि म्हणूनच आज हे औचित्यपूर्ण आहे. मी मुंबई विद्यापीठाचं मनापासून अभिनंदन करेन की आपण सावरकरांच्या नावाने अभ्यास आणि संशोधन केंद्र कारण स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनातल्या विविध पैलूंमध्ये इतकी ताकद आहे की त्यांच्या एक एक पैलूंवर 25-**

**25 वर्ष संशोधन केलं तरीदेखील आपण ते पूर्ण करू शकणार नाही अशा प्रकारचं ज्यांचं कार्य होतं त्यांच्या नावानं याठिकाणी हे संशोधन केंद्र इथं सुरू होतंय,मी राज्य सरकारच्या वाटीन आपल्याला आश्वस्थ करतो या संशोधन केंद्राकरता जो काही निधी लागेल तो आम्ही कधीच अपुरा पडू देणार नाही. हे आपल्याला चांगल्यात चांगलं संशोधन केंद्र आपल्याला कसं करता येईल यांचा आपण प्रयत्न करू**.

**<u>पंडित नेहरू</u>**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल त्यांना देशभरात आदरांजली अर्पण करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना आदरांजली अर्पण केली.

**<u>पंचायत</u>**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या संस्थांनी मोठं योगदान दिलं असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल मुंबईत सांगितलं. यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या अनेक भागात काल पावसाचा जोर कायम होता. पुण्यात काल पावसाच्या जोरदार सरींनी हजेरी लावली. तर मुंबईत हलका पाऊस पडला. पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर आपत्ती निवारण पथक पाहणी दौरा करणार असल्याने उद्या म्हणजेच 29 मे रोजी सिंहगड किल्ला पर्यटनासाठी बंद ठेवण्यात येणार असल्याचं पुणे वनविभागानं कळवलं आहे.

रत्नागिरीत कालही पावसाचा जोर कायम होता; जगबुडी आणि वाशिष्ठी नदीची पाणी पातळी काहीशी ओसरली आहे. दापोली तालुक्यातील एकाचा पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला. रायगडमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळं अनेक घराचं नुकसान झालं आहे; नेरळ इथं वीज कोसळून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचं पथक दाखल झालं आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्वच तालुक्यात काल पावसाचा जोर कायम होता; या पावसामुळे कोकम पिकाचं मोठं नुकसान झालं आहे.

अहिल्यानगर शहर आणि जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असून खडकी आणि वाळकी या गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती; याठिकाणी लष्करानं मदत कार्य राबवत अनेक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातही मुसळधार पाऊस झाल्याने नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

लातूर, बीड आणि जालना जिल्ह्याच्या बहुतांश भागात काल मुसळधार पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात वरवट इथं काल मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नाल्याला पूर आला असून या नाल्यात एक महिला आणि दोन लहान मुली वाहून गेल्या.

**मान्सून**

भारतीय हवामान खात्याने यावर्षीच्या मान्सूनचा दुसऱ्या टप्प्यातील अंदाज काल जाहीर केला. यावर्षी जून ते सप्टेंबर या काळात महाराष्ट्रासह देशातल्या विविध भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**आयपीएल क्रिकेट**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने लखनौ सुपर जाएन्ट्सचा 6 गडी राखून पराभव केला. लखनौने ऋषभ पंतच्या नाबाद शतकाच्या जोरावर बंगळुरूसमोर 228 धावांचं उद्दिष्ट ठेवलं होतं. बंगळुरूने 8 चेंडू राखून हे आव्हान पार केलं. बंगळूरूच्या विराट कोहलीने 54 तर जितेश शर्मानं 33 चेंडूत तडाखेबंद 85 धावा केल्या.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.